**<u>अर्ज निशाणी क्रमांक ४२ वर आदेश</u>**
(पारीत केल्याची तारीख **०६.०२.२०१९**)

**०१.** प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्रमांक ०१ व ०२ यांनी त्यांच्याविरुद्ध दिनांक **२८.११.२०१८** रोजी वादपत्र **<u>नि.क्र.०१</u>** वर झालेला ''विना कैफियत'' आदेश रद्द करण्यासाठी **<u>दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम १०</u>** नुसार दाखल केला आहे.

**०२.** वादींनी म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली.

**०३.** प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री. एच्. ए. वाघ व वादींतर्फे विधीज्ञ श्री. एम्. डी. पाटील यांचा युक्तिवाद ऐकला.

**०४.** प्रतिवादींना दिनांक **०६.०८.२०१८** रोजी समन्सची बजावणी होवूनही त्यांनी मुदतीत कैफियत दाखल केली नाही. म्हणून त्यांच्याविरुद्ध वादपत्र **<u>नि.क्र.०१</u>** वर दावा ''विना कैफियत'' चालवण्याचा आदेश पारीत झाला आहे.

**०५.** दावा ठराव व निरंतर मनाई हुकूमासाठी आहे. प्रतिवादींना कैफियत दाखल करण्याची संधी नाकारल्यास त्यांचे नुकसान होईल. प्रतिवादींना दाव्यामध्ये कैफियत दाखल करुन बचाव मांडण्याची संधी दिल्यास वादाचे कायमपणे निराकरण होण्यास मदत होईल. वादींचे त्यामुळे कोणतेही नुकसान संभवत नाही. प्रतिवादींनी समन्स बजावणीपासून सुमारे सहा महिने कैफियत दाखल न करून वादी व न्यायालयाचा अमुल्य वेळ वाया घालवला आहे. म्हणून त्यांच्यावर विलंबाचा खर्च लादून **''विना कैफियत''** चालवण्याचा झालेला आदेश रद्द करणे उचित होईल. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**अर्ज नि.क.४२/ड** **२** नियमीत दिवाणी दावा क्रमांक **१९/२०१८**
सौ. शकुंतला डाकी + १ विरूद्ध अनिल चव्हाण + ७

## <u>आ दे श</u>

**०१**. प्रतिवादींचा **<u>नि.क.४२</u>** मंजूर करण्यात येतो. प्रतिवादींनी वादींना एकत्रात रक्कम रुपये ५००/- खर्च द्यावा.

**०२**. वादपत्र **<u>नि.क.०१</u>** वर दिनांक **२८.११.२०१८** रोजी प्रतिवादीविरुद्ध दावा "विना कैफियत" चालवण्याचा झालेला आदेश **<u>दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम १०</u>** नुसार रद्द करुन त्यांची कैफियत अभिलेखावर सामील करुन घेण्यात येते.

**०३**. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात येतो.

**---स्वाक्षरी---**
**(सुभाष ल. फुले)**
**(एम एच आर जी ०००९ - २१२५)**
**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रोहा.**
**जिल्हा रायगड**

**स्थळ : रोहा**
**दिनांक : ०६.०२.२०१९**